# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र.५१३/२०२२/-तक्रार ५१४/२०२२छ.संभाजीनगर**
**(द्वितीय अपील क्र.४२९१/२०१९ -९०२८/२०१९मध्ये)**

श्री.महेश शंकरलाल शंकरपेल्ली, : तक्रारदार
रा.माँ दुर्गा निवास,शास्त्री कॉलनी,
सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्यालय सहायक,उपअधीक्षक भूमी अभिलेख
कार्यालय,सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक
जिल्हा अधीक्षक ,भूमी अभिलेख कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

**निर्णय**
**(दि. २०.०६.२०२४)**

तक्रारदार यांनी दि.२०.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोगाकडे कलम१८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदरील तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्यांनी नमूद केले की, व्दितीय अपील क्र.४२९१/२०१९ मध्ये आयोगाने दि.०२.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती संकलीत करुन आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसात अपिलार्थीस व्यक्तीश: विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशाप्रकारचे आदेश पारित केले आहे. सदरील आदेशाचे पालन न केल्यामुळे कलम २० नुसार शास्ती आणि नुकसान भरपाई देण्याचे आदेश पारित करण्याची मागणी केली आहे.

सदर प्रकरणावर यापूर्वी दि.१३.०६.२०२३, १७.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. त्यांनुसार श्री.एस.बी.सातव तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर यांना दि.०३.०८.२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती.

प्रस्तुत प्रकरणात आज दि.२०.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सदरील सुनावणीला तक्रारदार व श्रीमती चंद्रकला शेनफडु आग्रे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत.

सुनावणी दरम्यान तक्रारदार यांनी कथन केले की, आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे माहिती मिळाली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, सि.स.१२७३/१ ची संचिकेचा शोध धेतला असता नोंद वहित अ.न. २१ दिनांक ३/६/२००३ अन्वये सदर संचिका जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सादर केली असल्याचे अभिलेखावरुन आढळून येत आहे.

श्री.एस.बी.सातव तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर यांनी दि.१७.०१.२०२४ रोजी आयोगास लेखी युक्तीवाद सादर केला आहे, त्यांच्या लेखी युक्तीवादासोबत सादर केलेला कागदपत्रामध्ये वरील बाब नमूद करण्यात आली आहे.

सदर प्रकरणात वस्तुस्थिती निश्चित करण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील सक्षम अधिकारी यांना पाचारण करण्यात आले होते. त्यांना खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

सबब,आयोग खालीलप्रमाणे अंतरिम आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

तक्रार क्रमांक ५१३/२०२२ व तक्रार क्रमांक ५१४/२०२२ मध्यील व्दितीय अपील निर्णयामध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे अंतरिम आदेशापासून १५ दिवसात तक्रारदार यांना माहिती संदर्भातील योग्य ती वस्तुस्थिती कळविण्यात येऊन त्याचा अहवाल आयोगासमोर सादर करण्यासाठी ही अंतिम संधी देण्यात येत आहे.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (८) (क) अन्वये जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख छत्रपती संभाजीनगर यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. आयोगाने दिलेल्या आदेशानुसार विहित कालावधीत कार्यावाही न केल्यास आपणा विरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २०(२) मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाईसाठी शिफारस करण्यात येईल.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

तक्रार क्र.५१३/२०२२-५१४/२०२२छत्रपती संभाजीनगर जावक क्र. 10586/२०२४ दिनांक : 24/6/2024